# खाद्यपदार्थांचा आस्वाद मनापासून घ्या

पुणे : विविध देशांना भेटी देताना त्या त्या भागातील वैविध्यपूर्ण खाद्यपदार्थांचा आस्वाद मनापासून घेतला पाहिजे. त्यामुळे आपोआपच संस्कृतीची ओळख होत राहते, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी केले.

अनिल नेने लिखित 'खावे त्याच्या देशा आणि मनोगत' या पुस्तकांच्या दुसऱ्या आवृत्तीचे आणि ई-आवृत्तीच्या प्रकाशन समारंभाप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. वीणा देव, लेखक अनिल नेने, डॉ. अश्विनी नेने, विजय देव, बुकगंगाचे संस्थापक मंदार जोगळेकर उपस्थित होते. नेने यांची नातवंडे लारा व थियो डॉड यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. देव यांनी नेने यांच्या बाबतच्या आठवणी सांगितल्या.